# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### गोरेगाव आणि कांदिवली (जि.मुंबई उपनगर) येथील दोन चित्रपटगृहे बंद करण्यात आल्याने कामगार बेरोजगार झाल्याबाबत

**(१) १७०१ (२४-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) आणि कांदिवली (पश्चिम) येथील दोन मुव्ही मॅक्स चित्रपटगृहे कोणतीही पूर्वसूचना न देता दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान बंद करण्यात आल्याने ३० मराठी कामगार बेरोजगार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चित्रपटगृहे बंद होण्याची कारणे काय आहेत तसेच चित्रपटगृहांत काम करणाऱ्या मराठी कामगारांना न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१३-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मे.सिनेलाईन इंडिया लिमिटेड या व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येत असलेली गोरेगांव व कांदिवली येथील सिनेमागृहे ही सिंगल स्क्रिन असून, या सिनेमागृहांमध्ये व्यवसाय नसल्याने व्यवस्थापनाने, सदर चित्रपटगृहे बंद केलेली आहेत.

कामगार व व्यवस्थापन यांची तडजोड घडून आणण्याबाबत कामगार आयुक्त कार्यालयाकडून प्रयत्न करण्यात आले आहेत. औद्योगिक विवाद अधिनियम १९४७, च्या कलम २-के अंतर्गत २९ कामगारांना मागील सेवा सलग धरुन पूर्ववत कामावर घेण्याबाबतचा विवाद दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### निफाड व येवला (जि.नाशिक) तालुक्यातील योजनाबाह्य ग्रामीण मार्ग दर्जोन्नत करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२) २३३० (१०-०७-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील निफाड आणि येवला तालुक्यातील योजनाबाह्य रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली

असून ग्रामविकास विभागाने दिनांक १४ जून, २०२४ रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक आणि मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचेकडून मागविलेला प्रस्ताव दिनांक १२ मे, २०२५ रोजी पर्यंत शासनास प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येवला तालुक्यातील १७ आणि निफाड तालुक्यातील २७ योजनाबाह्य रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्यासाठी शासनाला त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव पाठविण्यास झालेल्या दिरंगाईबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून रस्ते विकास योजनेत समाविष्ट करण्यासाठी आणि दिरंगाईबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) :** (१) व (२) नाशिक जिल्ह्यातील निफाड व येवला तालुक्यातील योजनाबाह्य रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करणेबाबतचा प्रस्ताव अनुक्रमे माहे एप्रिल-२०२४ व जून-२०२४ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, सदर प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्याने त्याबाबतचा त्रुटी पुर्तता अहवाल दिनांक १४ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयाकडून मागविण्यात आला आहे. तसेच दिनांक २८/०८/२०२४ व दिनांक ०४/०३/२०२५ रोजीच्या स्मरणपत्रान्वये पुर्तता अहवाल सादर करणेबाबत पुनश्च: कळविण्यात आले आहे.
(३) उपरोक्त प्रस्तावामधील त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्तरावर सुरू आहे. सदरचा त्रुटी पुर्तता अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत

**(३) २४५९ (०९-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रात औद्योगिक विकासाला मोठी चालना देणारा निर्णय मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला असून, या बैठकीत एकूण ३ लाख ९२ हजार ५६ रुपये एवढया कोटी गुंतवणुकीच्या १७ महत्वाच्या प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, पुणे, रायगड आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत असून या गुंतवणुकीमुळे राज्यात हजारो रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१०-०९-२०२५) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

राज्यामध्ये उद्योगांचा समतोल विकास होण्यासाठी व कमी विकसित भागात उद्योगधंदे स्थापित व्हावे या कारणास्तव राज्यामध्ये सन १९६४ पासून सामुहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येते. राज्यातील विशाल/ प्रकल्पांना सुविधा/ प्रोत्साहने मंजूर मर्यादेपर्यंत ठरविण्याचे अधिकार मा.सचिव (उद्योग) यांना असून अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीस आहेत. तथापि, उद्योग घटकांनी धोरणात नमुद केलेल्या प्रोत्साहनापेक्षा अधिकची प्रोत्साहने मंजूर करण्याची मागणी केल्यास अशी प्रकरणे मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली स्थापित उच्चाधिकार समितीच्या शिफारसीसह मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतात.

मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक २५/०३/२०२५ रोजी आयोजित ११ व्या बैठकीमध्ये एकूण २१ प्रस्ताव उपसमितीच्या विचारार्थ सादर करण्यात आले होते. त्यापैकी २ धोरणात्मक बाबीचे प्रस्ताव वगळता उर्वरीत १९ उद्योग घटकांच्या प्रकल्पांना समितीने विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर १९ प्रकल्पांव्दारे राज्यात आगामी कालावधीत रुपये ३,९२,०५६ कोटी एवढी गुंतवणूक व १,०५,२२५ एवढी रोजगार निर्मिती होणार आहे.

समितीने १९ प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाबाबत बैठकीचे इतिवृत्त दिनांक ११/०४/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. तसेच सदर प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याच्या अनुषंगाने सचिव (उद्योग) यांच्या मान्यतेने देकारपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(४) २६६८ (१०-०७-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा अभ्यास करुन लिपिक वर्गीय गट-क मधील पदोन्नतीचे स्तर कमी करणेबाबत ग्रामविकास विभागाने समिती गठीत केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समितीने अहवाल सादर केला आहे काय, असल्यास त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

“जिल्हा परिषदेकडील लिपिक वर्गीय संवर्गाचे पदोन्नतीचे स्तर कमी करणे” याबाबत ग्रामविकास विभागाच्या दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये "एक समिती" गठित करण्यात

आली आहे.
(२) सदर समितीने दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे.

लिपिकवर्गीय स्तर कमी केल्याने आर्थिक भार पडू शकतो किंवा कसे याबाबत तपासणी करुन घेण्यासाठी दिनांक १४ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये समितीस कळविले असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदांची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(५) २६८१ (०९-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३४ जिल्हा परिषदांची १९ हजारांवर विविध विभागांची देयके निधी अभावी प्रलंबित असल्याने विकासकामांवर परिणाम होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने प्रलंबित देयकांचा आढावा घेऊन जिल्हा परिषदांना निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील ३४ जिल्हा परिषदांकडे विविध विभागांची निधी अभावी प्रलंबित असलेल्या देयकांचा आढावा घेऊन सदर देयके सन २०२४-२५ व सन २०२५-२६ च्या अनुदानातून भागविण्यात येत आहेत.
(२) वित्त विभागाच्या दिनांक १४/०२/२०२५ च्या शासन निर्णयानुसार आभासी वैयक्तीक ठेव लेखा प्रणाली लागू करण्यात आली असून सदर प्रणालीद्वारे आहरीत केलेला निधी ३६५ दिवसात खर्च करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे प्रलंबित देयकांचा खर्च हा मागील वर्षात आहरीत केलेल्या निधीतून करता येईल. तसेच चालू वित्तीय वर्षात मंजूर केलेल्या अनुदानातून प्रलंबित देयके अदा करण्यात येत आहेत. त्याव्यतिरिक्तही काही देणी शिल्लक राहिल्यास आवश्यकतेनुसार पुरवणी मागणीद्वारे निधी मंजूर करून देयकाचा निपटारा करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जि.अकोला) अंतर्गत सुपर स्पेशालिटी रुग्णालयात यंत्रसामुग्री बंद असल्याबाबत

**(६) २७६० (१०-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जि.अकोला) अंतर्गत सुपर स्पेशालिटी रुग्णालयांमध्ये गरिब रुग्णांसाठी गत पाच महिन्यांपूर्वीच अँजिओग्राफी, न्यूरोलॉजी, कार्डिओलॉजी, ऑर्थोपेडिक्स, यूरोलॉजी,

गॅस्ट्रोअँटेरोलॉजी, नेफ्रॉलॉजी आणि कॅन्सर या विभागांसह आठ प्रमुख विभाग कार्यान्वित करण्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जि.अकोला) येथील अल्पावधीतच अँजिओग्राफी मशीन बंद पडल्याने अनेक रुग्णांची गैरसोय होत असून खाजगी प्रयोगशाळेतून सदर तपासणी करावी लागल्याने रुग्णाचा वेळ आणि पैसा खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी सदर रुग्णालयातील बंद पडलेली अँजिओग्राफी मशीन त्वरित दुरुस्त करण्याबाबत कोणती शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१७-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे,
(२) व (३) हे खरे नाही,
तांत्रिक बिघाडामुळे १ ते २ दिवस मशीन बंद होती. संबंधित कंपनी इंजिनिअर यांच्याकडून सदर अँजीओग्राफी मशीन त्वरीत दुरुस्ती करण्यात आली व सदर मशीन रुग्णसेवेकरीता कार्यान्वित करण्यात आलेली आहे.
(४) लागू नाही

---

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील परिचारिकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) २९१९ (१०-०७-२०२५) श्री.योगेश टिळेकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वैद्यकीय शिक्षण विभागातंर्गत असलेल्या रुग्णालयातील "गट- अ" ते "गट-ड" तसेच ३५३४३ परिचारिकांची पदे मान्य असून या मान्य पदांपैकी २६२५५ पदे भरलेली असून जवळपास ९०८८ पदे रिक्त असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात वैद्यकीय विभागातंर्गत असलेल्या रुग्णालयांमध्ये प्रत्येकी ५ रुग्णामागे १ परिचारिका असणे अपेक्षित असताना सध्यस्थितीत २० रुग्णामागे १ परिचारिका असल्याचे निदर्शनास आले असून यामुळे या परिचारिकांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे याकरीता ९०८८ इतकी रिक्त असलेली परिचारिकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अधिपरिचारिकांची एकूण १६०८८ एवढी पदे मंजूर असून त्यापैकी १०८५३ एवढी पदे भरण्यात आलेली आहेत व ५१८५ एवढी पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
भरती प्रक्रिया सन २०२३ अन्वये ४००० अधिपरिचारिकांची रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच माहे डिसेंबर, २०२४ मध्ये ८३६ अधिपरिचारीकांना परिसेविका पदावर पदोन्नती देण्यात आलेली

आहे. भरती प्रक्रिया सन २०२३ झाल्यानंतर सन २०२४ मध्ये राज्यातील १० नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये सुरू करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. पदोन्नतीने रिक्त झालेली अधिपरिचारिकांची पदे तसेच नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अधिपरिचारिकांची रिक्त पदे भरण्याबाबत संचालनालयाकडून बिंदुनामावलीवर काम सुरु आहे. सदर बिंदूनामावलीचे काम पूर्ण झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. २० रुग्णामागे १ परिचारिका असल्याची बाब व त्यामुळे परिचारिकांवर कामाचा अतिरिक्त ताण येतो ही बाब खरी नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जलसंधारण विभागतील प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांचे आदेश रद्द करण्यात येत असल्याबाबत

**(८) २९८३ (१०-०७-२०२५) श्री.शशिकांत शिंदे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील २३ वर्षांत (२००१ ते २०२४) प्रशासकीय मान्यता मिळालेली परंतु अद्याप सुरू न झालेली आणि काही ठिकाणी अपूर्ण असलेली तब्बल १५०० कोटी रुपयांची जलसंधारणाची कामे तात्काळ रद्द करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोंदयानी माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मंत्री जलसंधारण महोदयांनी ही कामे रद्द करण्यासाठीचे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना विभागाला केल्या असून सदर आदेश देण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कोणकोणत्या जिल्ह्यातील किती कामे आतापर्यंत रद्द करण्यात आली आहेत वा येत आहे तसेच जलसंधारणच्या अपूर्ण असलेली संबंधित कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१३-१०-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) मागील ३ वर्षात स्थानिक / शेतकऱ्यांचा विरोध, भूसंपादनातील अडचणी व वनजमिनीची परवानगी मिळण्यात अडचणी या कारणास्तव बंद व रखडलेल्या योजनांना रद्द करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) राज्यातील शासन निधी अंतर्गत एकूण ९०३ योजना रद्द करण्यात आलेल्या आहेत. तसेच महामंडळ निधी अंतर्गत एकूण १३२ योजना रद्द करण्याच्या सूचना महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आल्या आहेत.

तसेच राज्यातील जलसंधारणाच्या अपूर्ण/ रखडलेल्या योजनांपैकी पूर्ण होण्यासारख्या कामांची आवश्यकतेनुसार फेर निविदा करुन सदर कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लॉकडाऊनच्या काळात ग्रामीण भागातील घर टॅक्स व पाणीपुरवठा देयके माफ करण्याबाबत

**(९) ३१०९ (०२-०६-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लॉकडाऊनमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णतः ढासळलेली असल्याचे निदर्शनास आले असून ग्रामीण भागात घर टॅक्स, पाणीपुरवठा देयके भरली जात नसून ग्रामपंचायतीला महावितरणकडून वीज देयक न भरल्यास पाणीपुरवठ्याचे वीज कनेक्शन बंद करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१८-१९ मध्ये तत्कालीन शासनाने दुष्काळी गावातील पाणीपुरवठ्याचे वीज देयके माफ केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील घर टॅक्स व पाणीपुरवठा देयक माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२५-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही,
लॉकडाऊन काळात कुठल्याही ग्राहकाचा वीजपुरवठा खंडीत करण्याबद्यलच्या सूचना महावितरण कंपनीमार्फत देण्यात आलेल्या नव्हत्या.
(२) हे खरे नाही.
(३) मदत व पुर्नवसन शासन निर्णय दिनांक ११/१२/२०१८ अन्वये दुष्काळ भागातील शहरी व ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांची थकीत विद्युत देयकांच्या मुदलांपैकी ५% रक्कम व माहे नोव्हेंबर २०१८ ते जून २०१९ या ८ महिन्याच्या कालावधीतील शहरी व ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांची चालू विद्युत देयके मदत व पुनर्वसन विभागाच्या टंचाई निधीमधुन अदा करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## तळेगाव (शा.पं) (ता.आष्टी जि.वर्धा) येथे नागरी सुविधा व जनसुविधा विशेष अनुदान या योजनेतंर्गत निधी ग्रापमपंचातीला उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) ३१२९ (१०-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव (शा.पं) (ता.आष्टी जि.वर्धा) येथे नागरी सुविधा व जनसुविधा विशेष अनुदान या योजनेतंर्गत सन २०२४-२०२५ अंतर्गत ५६ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून तळेगाव (शा.पं) ग्रामपंचायतीच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली असतानाही सदरची विकास कामे अद्यापही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीच्या विकास कामांमध्ये गटविकास अधिकारी पं.स.आष्टी व मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वर्धा व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जि.प.वर्धा यांचेकडून तांत्रिक त्रुटी काढून विकास निधी देण्यास विलंब करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्रामपंचायतीला विकासनिधी तात्काळ मिळणेबाबत मा.मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १३ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, २०२४-२०२५ मध्ये जनसुविधा व नागरी सुविधा अंतर्गत मंजूर असलेला ५६ लाख रुपयांचा निधी ग्रामपंचायत तळेगाव (शा.पं) ला तात्काळ मिळणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२५-०८-२०२५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सन २०२४-२०२५ अंतर्गत जन सुविधेसाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत ग्रामपंचायत तळेगाव करीता एकूण २६.०० लक्ष रक्कमेची ३ कामे मंजूर होती. त्यापैकी २ कामांसाठी रुपये १०,५०,०००/- इतका निधी पंचायत समिती, आष्टी यांना वितरीत केला आहे. तसेच २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये नागरी सुविधाअंतर्गत जिल्हा नियोजन समितीने मौजे तळेगाव (शा.पंत) करीता एकूण ३०.०० लक्ष रक्कमेची कामे मंजूर केली आहेत. परंतु, या कामांच्या आराखड्यात त्रुट्या आढळल्याने प्राकलनासह प्रस्ताव गट विकास अधिकारी, पंचायत समिती आष्टी यांचेकडे त्रुटी पुर्तता करण्यासाठी फेरसादर करण्यात आला आहे. अद्याप त्रुटी पुर्ततेसह प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. त्यामुळे रुपये ३०.०० लक्ष रक्कमेचा निधी अद्याप प्राप्त झालेला नाही.
(३) हे खरे आहे.
(४) यासंदर्भात जिल्हा परिषद वर्धा यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे. तथापि, जिल्हा परिषद, वर्धा यांच्या दिनांक २९/०७/२०२५ च्या आदेशान्वये रक्कम रुपये १०,५०,०००/- एवढा निधी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी करीता वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच, सन २०२४-२०२५ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (लेखाशीर्ष २५१५ १५९७) अंतर्गत मौजे तळेगाव (शा.पंत) करीता रक्कम रुपये ३०.०० लक्ष जिल्हा नियोजन समितीने मंजूर केले होते. परंतु, आराखड्यात त्रुट्या आढळून आल्यामुळे प्राकलनासह प्रस्ताव गट विकास अधिकारी, पंचायत समिती आष्टी यांचेकडे त्रुटी पुर्तता करण्यासाठी फेरसादर करण्यात आला होता.अद्याप त्रुटी पुर्ततेसह प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठी पुस्तकांचे गाव ह्या संकल्पनेची राज्यातील प्रत्येक विभागीय स्तरावर अंमलबजावणी करण्याबाबत

**(११) ३१५५ (१०-०७-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भिलार (जि.महाबळेश्वर) येथे राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या माध्यमातून माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान भारताचे पहिले पुस्तकांचे गाव सुरू करण्यात आले असून काश्मीरच्या खोऱ्यातील आरागाम (जि.बंदीपोरा) या गावात राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या राज्य मराठी

विकास संस्था आणि पुणे येथील एका संस्थेच्या माध्यमातून मराठी पुस्तकांचे गाव तयार करण्यात येणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काश्मिर येथील आरागाम (जि.बंदिपोरा) येथे तयार करण्यात येत असलेल्या मराठी पुस्तकांच्या गावाबाबत आवश्यक निधी, जागा, इतर परवानग्या, गावाची रचना याबाबत शासनाने धोरण, आराखडे तयार केले आहेत काय, असल्यास त्याचा तपशील काय आहे तसेच त्याकरीता करावयाची आवश्यक कार्यवाही निश्चित केली आहे काय,

(३) असल्यास, भिलारच्या धर्तीवर राज्यात विभागीय स्तरावर ही योजना सुरू करण्याचा निर्णय मराठी भाषा विभागाने घेतला आहे काय, असल्यास राज्यात कोणकोणत्या ठिकाणी पुस्तकांचे गाव उभारण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी आवश्यक निधी, जागा व इतर परवानग्या घेऊन विभागीय स्तरावर सदर योजना सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०९-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) काश्मीरच्या खोऱ्यातील आरागम (जि.बंदीपोरा) या गावात राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि पुणे येथील “सरहद” या संस्थेच्या माध्यमातून मराठी पुस्तकांचे गाव तयार करण्याची घोषणा मा.मंत्री (मराठी भाषा व उद्योग) यांनी केली आहे. त्यानुषंगाने आरागाम (जि.बंदीपोरा) येथे मराठी पुस्तकांचे गाव तयार करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(३) मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार, संवर्धन व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी या दृष्टीने “पुस्तकांचं गाव” भिलार, या योजनेच्या यशाच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषा विभागाच्या दिनांक ०४/०१/२०२२ च्या शासन निर्णयान्वये “पुस्तकांचे गाव” ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात विस्तारित स्वरुपात करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. मराठी भाषा विभागाच्या दिनांक २५/०३/२०२२ च्या शासन निर्णयान्वये या योजनेमधील पहिल्या टप्यांत औरंगाबाद महसूल विभाग, नागपूर महसूल विभाग, कोकण विभाग व पुणे महसूल विभाग या ०४ महसूली विभांगातून अनुक्रमे वेरुळ, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद, नवेगाव बांध, ता.अर्जुनी-मोरगाव, जि.गोंदिया, पोंभुर्ले ता.देवगड जि.सिंधुदुर्ग व अंकलखोप (औंदुबर) ता.पलूस, जि.सांगली ही ०४ गावे निश्चित करण्यात आली आहेत. तसेच तद्नंतर मराठी भाषा विभागाच्या दिनांक २०/०८/२०२४ च्या शासन निर्णयान्वये पुस्तकांच गाव योजना विस्तार अंतर्गत नाशिक महसूल विभागातील अंमळनेर, जि.जळगाव येथे पुस्तकांचं गाव निर्माण करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड गणपुतीपुळे या गावांमध्ये पुस्तकांचे गाव सुरु करण्यात येणार आहे.

(४) मराठी भाषा विभागाच्या दिनांक ०४/०१/२०२२ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार तरतुदींनुसार पुस्तकांचे गाव ही योजना विभागीय स्तरावर राबविण्याकरीता राज्य मराठी विकास संस्थेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विदर्भात विशेषत: अमरावती विभागातील औद्योगिक वसाहतीतील उद्योगांच्या गुंतवणुकीबाबत

**(१२) ३३९८ (०९-०७-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या उद्योग विभागामार्फत मागील ५ वर्षात आतापर्यंत समजुतीचा करारनामा (Memorundam Of Understanding) झालेल्यापैकी विदर्भात किती गुंतवणूक झालेली आहे तसेच सदर गुंतवणूकीमधील अमरावती विभागात आतापर्यंत किती गुंतवणूक करण्यात आलेली आहे,

(२) असल्यास, सदर गुंतवणूक करणाऱ्या उद्योजक कंपन्या कोणकोणत्या आहेत व सदर कंपन्यांकडून विदर्भात तसेच अमरावती विभागात किती गुंतवणूक करण्यात आली आहे व शासनाने नवे प्रकल्प उभारणीबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१०-०९-२०२५) :** (१) व (२) मागील ५ वर्षात उद्योग विभागामार्फत राज्यात रुपये १९,६२,०८५ कोटीच्या गुंतवणूकीचे २४६ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या माध्यमातून १४ लक्ष इतका रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. उपरोक्त सामंजस्य करारांतून विदर्भातील ५८ उद्योग घटकांसमवेत सामंजस्य करार झाले असून त्यामधून सुमारे रुपये ६,८४,५१९ कोटींची गुंतवणूक असून यातून १,८२,५०९ इतका रोजगार होणे अपेक्षित आहे. त्यापैकी अमरावती भागात ९ उद्योग घटकांशी सामंजस्य करार झाले असून रक्कम रुपये ३,४२६ कोटींची गुंतवणूक व ५,२२० रोजगार होणे अपेक्षित आहे.

विदर्भामध्ये औद्योगिकीकरणासाठी वाव असणाऱ्या कापड उद्योग, अन्न प्रक्रिया उद्योग व संरक्षण व अवकाश क्षेत्रातील गुंतवणूकीला चालना देण्यासाठी विशेष समर्पित धोरण आखण्यात आली आहेत. मराठवाडा / विदर्भासाठी रोजगारावर आधारित मोठ्या विशाल अतिविशाल प्रकल्पांसाठी किमान गुंतवणूकीचा तसेच रोजगार निर्मितीसाठीचा किमान मर्यादा राज्याच्या इतर भागापेक्षा कमी आहे. तसेच सामुहिक प्रोत्साहन योजना सन २०१९ अतर्गत सुक्ष्म लघु व मध्यम तसेच मोठ्या व विशाल प्रकल्पांना आकर्षित करण्यासाठी अतिरिक्त वित्तीय प्रोत्साहने व प्रोत्साहने उपभोगण्यासाठी अधिकचा कालावधी दिलेला आहे.

राज्यात महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात प्रस्तावित उद्योगांना महामंडळामार्फत रस्ते विज पाणी मलनिस्सरण इ. पायाभुत सुविधांनी युक्त असे विकसित भुखंड रास्त दराने पुरविले जातात. नवीन उद्योग सुरू करण्यासाठी करण्यात येणारी भूखंड वाटप प्रक्रिया संपूर्णत: संगणीकृत असून नवीन उद्योगांना देण्यात येणाऱ्या सर्व परवानग्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या एक खिडकी प्रणालीव्दारे उपलब्ध करुन देण्यात येतात. रुपये ५० कोटीच्या वर गुंतवणुक असलेल्या देशांतर्गत उद्योग तसेच विदेशी गुंतवणूकदारांना २० पेक्षा अधिक विभागाच्या १०० हून अधिक परवानग्या महा परवाना या एक खिडकी प्रणालीव्दारे मुदतबंद स्वरुपात देण्यात येतात. उद्योग विभागामार्फत उद्योगाकरीता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सुविधांमुळे गुंतवणूक स्नेही वातावरण निर्माण झाले असून त्यामुळे अमरावती सह विदर्भात सर्व भागात उद्योगधंदयाची वाढ होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील शिरभावी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा खंडीत असल्याबाबत

**(१३) ३४३५ (१०-०७-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील आशिया खंडातील सर्वात मोठी ८२ गावांना ५५० वाड्यावस्त्यांना पाणीपुरवठा करणारी शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना गेल्या ९ महिन्यांपासून खंडीत वीज पुरवठ्यामुळे बंद झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिरभावी योजनेचा खंडीत विजपुरवठा सुरु करण्यासंदर्भात योजनेतील ५९ ग्रामपंचायतींची पाणी मागणी आणि थकबाकी यावर तोडगा काढण्यासंदर्भात तसेच तालुक्यातील पाणी टंचाईची परिस्थिती पाहता संबंधित योजना त्वरीत सुरु व्हावी यासाठी थकीत वीजबील जिल्ह्याच्या आकस्मित निधीतुन भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०५-०९-२०२५) :** (१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून ठोक स्वरुपात ८२ गावांना पाणीपुरवठा केला जातो. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या थकबाकीमुळे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने दिनांक २१/११/२०२४ रोजी योजनेचा विद्युत पुरवठा खंडीत केलेला आहे.

(२) शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याकरीता योजनेची विद्युत जोडणी पूर्ववत करणे व वाढीव वीज भार मंजूर करणेबाबत, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सोलापूर, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, पुणे तसेच जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे स्तरावरुन अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना कळविले आहे.

पाणी टंचाई कृती आराखडा सुधारित करुन सदर सुधारित आराखड्यामध्ये मा.जिल्हाधिकारी यांनी शिरभावी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची थकीत वीज देयकाची रक्कम रुपये ५.४१ कोटी इतकी थकबाकी समाविष्ट करुन एकूण रक्कम रुपये ४५५६.१२/- लक्ष इतक्या किमतीचा सुधारित आराखडा मान्यतेस्तव शासनास प्राप्त झाला आहे.

तथापि, थकित वीज देयकाची रक्कम रुपये ५.४१ कोटी ही टंचाईकरीता अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधीमधून उपलब्ध करुन देणे अनुज्ञेय नसल्याने "विशेष बाब" म्हणून सदर देयक अदा करण्यासाठी रुपये ५.४१ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभागास सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपळनेर (ता.साक्री जि.धुळे) येथील पाणीपुरवठा योजनेतील त्रुटी निवारण करुन नळजोडणी करण्याबाबत

**(१४) ३८८९ (१७-०७-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळनेर (ता.साक्री जि.धुळे) शहर येथील पाणीपुरवठा योजनेला माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता मिळाली असून या योजनेत नळ जोडणी कामाचा समावेश नसल्यामुळे आजतागायत सदर योजना पूर्ण होऊनही नळाद्वारे नागरिकांना पाणी उपलब्ध झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही भागात जलशुद्धीकरण केंद्रातून जुन्या जोडणी धारकांना पाणी जुन्याच व्यवस्थेद्वारे दिले जात असून या योजनेचा लाभ शहराला मिळत नसून या योजनेला महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेतील अनेक त्रुटी, अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणामुळे पिंपळनेर येथील नागरिक शुध्द पाण्यापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास सदर योजनेतील त्रुटी दूर करून योजना पूर्ण क्षमतेने चालू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१०-०९-२०२५) :** (१) मौजे पिंपळनेर (ता.साक्री, जि.धुळे) योजनेस पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय दिनांक १४/०३/२०२२ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. नळ जोडणी ग्रामपंचायत मार्फतच करण्यात येत असल्यामुळे योजनेतील निविदेत नळ जोडणी कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत योजनेची कामे गुणवत्ता पूर्वक करुन यशस्वीरित्या चाचणी करुन तत्कालीन पिंपळनेर ग्रामपंचायत प्रशासनास दिनांक २३/०१/२०२३ रोजी हस्तांतरित करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत पिंपळनेर ही नगरपरिषद असून नगरपरिषदेमार्फत पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(२) हे खरे आहे.

सदर योजनेस दिनांक १४/०३/२०२२ च्या शासन निर्णयान्वये रुपये ११४६.१७ लक्ष किंमतीस सुधारीत मान्यता देण्यात आली असून शहरातील जुन्या जोडणी धारकांना काही भागात जलशुद्धीकरण केंद्रातून पाणीपुरवठा सुरु आहे. त्यामुळे सुधारीत योजनेनुसार जुन्या जोडणीसह नगरपरिषदेमार्फत शहरास लाभ मिळत आहे.
(३) हे खरे नाही.

सदर योजनेची कामे गुणवत्ता पूर्वक करुन तत्कालीन पिंपळनेर ग्रामपंचायत प्रशासनास दिनांक २३/०१/२०२३ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.
(४) सद्य:स्थितीत पिंपळनेर नगरपरिषदेमार्फत नागरिकांना जलशुद्धीकरण केंद्रातून शुध्द पाण्याचा पुरवठा सुरळीत सुरु आहे. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्रशासनातील पदोन्नती व बदली प्रक्रियेत झालेल्या अनियिमिततेबाबत

**(१५) ३९३६ (१०-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील सन २०२४-२५ या वर्षात कनिष्ठ प्रशासन अधिकारी ते सहाय्यक प्रशासन अधिकारी या संवर्गात झालेली पदोन्नती शासन निर्णयानुसार झालेली नसून तसेच येथील झालेली बदली प्रक्रिया अन्यायकारक असल्याने शासन निर्णयानुसार सुधारित पदोन्नतीची जेष्ठता यादी तयार करण्याची प्रक्रिया राबविण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त, अमरावती व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बुलढाणा यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, शासन निर्णयानुसार सुधारित पदोन्नतीची जेष्ठता यादी तयार करण्याची प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी श्री.एकनाथराव खडसे, विधानपरिषद सदस्य, यांनी दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये बुलढाणा जिल्हा परिषदेतील कनिष्ठ प्रशासन अधिकारी ते सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या पदोन्नतीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बुलढाणा यांना निवेदन दिले आहे. तथापि, त्यावेळी पदोन्नती प्रक्रीया झालेली नव्हती.
(२) मा.लोकप्रतिनिधी यांच्या पत्राच्या अनुषंगाने निवडसूची वर्ष २०२४-२५ या मधील कनिष्ठ प्रशासन अधिकारी ते सहाय्यक प्रशासन अधिकारी या संवर्गाच्या पदोन्नतीच्या ज्येष्ठता यादीतील आक्षेप असलेल्या अ.क्र. ३, ६, ७ व ८ वरील कर्मचारी यांच्या पदोन्नती प्रलंबित ठेवलेल्या आहेत. उर्वरीत पात्र कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या सहायक प्रशासन अधिकारी या संवर्गातील ४ पदे रिक्त ठेवून व सन २००० पासून सुधारित निवडसूची करण्याच्या अधीन राहून करण्यात आलेल्या आहेत.
(३) सन २००० पासून सुधारित निवडसूची तयार करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे. तथापि, आक्षेपातील कर्मचारी यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे अपिल दाखल केले असून अपिलावरील निर्णयानुसार जिल्हा परिषदेकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(१६) ३९७४ (१५-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनासाठी आवश्यक निधी उपलब्ध न झाल्याने ठेकेदारांची ८० कोटींची देयके जि.प. कडे प्रलंबित असल्याने येथील जलजीवन मिशनची कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेसाठी उर्वरित निधी तात्काळ उपलब्ध करणेबाबत तसेच ठेकेदारांची देयके अदा करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१२-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कंत्राटदारांच्या थकित देयकांची पूर्तता करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे केंद्र हिस्सा उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य शासनाकडून पाठपुरावा सुरु आहे. केंद्र शासनाकडून केंद्र हिस्सा अप्राप्त असताना जल जीवन मिशन योजनेंतर्गत सुरु असलेल्या कामांवर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून राज्य शासनाकडून माहे मार्च, २०२५ मध्ये "विशेष बाब" म्हणून निधी अंमलबजावणी यंत्रणांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. याखेरीज, सद्य:स्थितीत केंद्र हिस्सा अप्राप्त असल्यामुळे सन २०२५-२६ या कालावधीमध्ये राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून निधी प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावखेडा सिम (ता.यावल, जि.जळगाव) या गावाचा पेसा अंतर्गत समावेश करणेबाबत

**(१७) ३९९८ (१०-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावखेडा सिम (ता.यावल जि.जळगाव) या गावाचा अनुसूचित क्षेत्राचा (पेसा) दर्जा मिळावा म्हणून शेकडो आदिवासीनी प्रकल्प कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले असल्याची बाब दिनांक २५ मार्च २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावखेडा सिम (ता.यावल जि.जळगाव) या गावाचा (पेसा) अंतर्गत समावेश करणे संदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (१८-०८-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावामध्ये मौजे सावखेड सिम ता.यावल, जि.जळगाव या गावाचा राज्याच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये समावेश करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जउळके (ता.खेड, जि.पुणे) येथील ग्रामीण रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत

**(१८) ४१६५ (१०-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जउळके खुर्द, खारदरा वस्ती ते वाफगांव रोड (ठाकरवाडी मार्गे) (ता.खेड, जि.पुणे) येथील गट क्रमांक ६८१ मधून साधारणपणे ३ कि.मी. जात असून सदर मार्गचे डांबरीकरण झाल्यास शेतकरी व ग्रामस्थांना सोईस्कर होणार असल्याने तेथील ग्रामस्थांनी तसेच ग्रामपंचायतीने याबाबतचा ठराव माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठरावानुसार सदरील रस्ता करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.

मौजे जऊळके खु. ते खारदरा हा रस्ता सन २००१-२०२१ या रस्ते विकास आराखड्यात सामाविष्ट नाही. त्यामुळे सदर रस्ता हा योजनाबाहय आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी २/०५० कि.मी. आहे. त्यापैकी कि.मी.०/०० ते ०/५५० मी. लांबीचे डांबरीकरण झालेले आहे. उर्वरीत कि.मी. ०/५५० ते २/०५० मीटर लांबीचा असून ती बैलगाडी वाट आहे. सदर रस्त्याचे काम हाती घेण्याबाबत ग्रामपंचायत ठराव झालेला आहे. रस्त्यालगत दुतर्फा असणाऱ्या स्थानिक शेतकऱ्यांची संमती पत्र मिळणे बाकी आहे. शेतकऱ्यांची संमती मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही शक्य आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील सेंट जॉर्ज रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरमधील छतामधून गळती होत असल्याबाबत

**(१९) ४३८६ (१५-०७-२०२५) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सेंट जॉर्ज रुग्णालयातील पहिल्या मजल्यावरील ऑपरेशन थिएटरचे दोन वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्च करून काम केले असतानाही ऑपरेशन थिएटरच्या छतातून पाणी गळत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोन वर्षांपूर्वी केलेले बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असल्याने सदर काम करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१७-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) पाण्याची गळती मुख्य शस्त्रक्रियागृहाच्या वरील छतावर जे डक्ट प्रस्थापित केलेले आहे. त्यामधून झालेली आहे. याबाबत छतावरील डक्टची दुरुस्ती केलेली आहे व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुन्हा पाण्याची गळती होणार नाही याबाबतची उपाययोजना करण्यात आलेली आहे.

---

## राज्यात महिला-स्नेही ग्रामपंचायत उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(२०) ४३९८ (१०-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यासह देशातील प्रत्येक जिल्ह्यात महिला आणि कन्यास्नेही किमान एक आदर्श ग्रामपंचायत स्थापन करण्याचा निर्णय दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पंचायत राज मंत्रालयाने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच उक्त निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी सुरु झाली आहे काय वा याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पंचायती राज विभाग, भारत सरकार यांनी प्रत्येक जिल्ह्यातून एक पथदर्शी महिला स्नेही ग्रामपंचायत विकसित करणेबाबत सूचना निर्गमित केलेल्या होत्या. ज्यामुळे शाश्वत विकास ध्येयांच्या ९ संकल्पनांमधील महिला स्नेही ग्रामपंचायत या ९ व्या संकल्पनेवर लक्ष केंद्रित करता येईल.याअनुषंगाने United Nations Population Fund (UNFPA) यांच्या सहकार्याने यशदा येथे ३ दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये राज्य स्तरीय ७ प्रविण प्रशिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले आहे.जिल्हा परिषदांमार्फत जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना पथदर्शी ठरेल अशी एक आदर्श महिला स्नेही ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातून एक अशा एकूण ३४ ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली आहे.राज्यातील अशा ३४ ग्रामपंचायतींच्या सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांना महिला स्नेही ग्रामपंचायत तयार करणेबाबत यशदा मार्फत दिनांक ५ व ६ मार्च, २०२५ रोजी राज्य स्तरीय कार्यशाळेचे आयोजन करून प्रशिक्षण देण्यात आले.

पंचायती राज विभाग, भारत सरकार यांनी ८ मार्च, २०२५ रोजी महिला दिनांनिमित्त निवडलेल्या महिला स्नेही ग्रामपंचायतींमध्ये विशेष महिला प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये निवडलेल्या ३४ महिला स्नेही ग्रामपंचायतीमध्ये विशेष महिला प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले.जिल्ह्यातून निवडलेल्या एका ग्रामपंचायतीच्या महिला विकास विषयक उपक्रमांची अंमलबजावणी संदर्भात प्रगतीक माहिती भरण्यासंदर्भात पंचायती राज विभाग, भारत सरकार यांनी Panchayat Advancement Index -PAI पोर्टलवर एक डॅशबोर्ड तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत सन २०२५-२६ मधील मंजूर आराखड्यानुसार महिला स्नेही ग्रामपंचायतींमध्ये केलेल्या अंमलबजावणीबाबत यशदा मार्फत त्रैमासिक आढावा घेण्यात येणार आहे.
(३) लागू नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.